



मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482




# चिखलीतील दोन रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात!

## पाठपुराव्यानंतर रस्ते पूर्णत्वाच्या मार्गावर; श्रेयवादासाठी राजकीय चढाओढ!

» पिंपरी | प्रतिनिधी

**महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील चिखली चौक ते सोनवणेवस्तीकडे जाणाऱ्या २४ मीटर तसेच १८ मीटर रस्त्याचे रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून ते अंतिम टप्प्यात आले आहे. यासाठी ८ फेब्रुवारी २०२४ ते २६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानंतर महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू असताना स्थायी समितीच्या दिनांक १५ मार्च २०२४ रोजीच्या बैठकीत ठराव क्रमांक ३४५९ अन्वये या कामाला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपीठ कडे जाणारा १८ मीटरचा रस्ता अशी दोन्ही रस्त्यांची कामे पूर्णत्वाच्या मार्गावर असून त्यामुळे लवकरच चिखलीकरांना दिलासा मिळणार आहे.**




चिखली परिसरातील वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता या दोन्ही रस्त्यांचे काम महत्त्वाचे मानले जात आहे. नागरिकांच्या सोयीसाठी २४ मीटर रुंदीचा रस्ता मंजूर करण्यात आला होता. गेल्या तीन वर्षांपासून या रस्त्यांसाठी पाठपुरावा सुरू होता. आता दोन्ही रस्त्यांची कामे जवळपास पूर्णत्वाकडे पोहोचल्याने लवकरच नागरिकांना त्याचा लाभ मिळण्याची शक्यता आहे.

या रस्त्यांच्या कामांसाठी ८ फेब्रुवारी २०२४ ते २६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत प्रशासकीय राजवट सुरू असताना स्थायी समितीच्या १५ मार्च २०२४ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्रमांक ३४५९ अन्वये या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. त्यानंतर या रस्त्यांच्या कामांना गती मिळाली असून सध्या दोन्ही रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात असल्याचे चित्र आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्यांची कामे पूर्णत्वाकडे जात असताना स्थानिक लोकप्रतिनिधींमध्ये श्रेय घेण्याची चढाओढ सुरू झाल्याची चर्चा आहे. रस्त्यांसाठी कोणी पाठपुरावा केला, मंजुरी मिळविण्यासाठी कोणी प्रयत्न केले आणि कामे मार्गी लावण्यात कोणाची भूमिका महत्त्वाची ठरली, यावरून राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.

प्रत्यक्षात नागरिकांना चांगले रस्ते मिळणे आणि त्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होणे, हेच या विकासकामांचे प्रमुख उद्दिष्ट असायला हवे. मात्र, कामे पूर्ण होण्याच्या टप्प्यावर श्रेयवादाला महत्त्व मिळत असल्याने विकासकामांभोवती राजकीय वातावरण निर्माण झाले आहे.

या श्रेयवादाच्या चर्चेत स्थानिक नागरिकांनी मात्र आपली भूमिका स्पष्ट केली आहे. रस्त्यांच्या कामाचे श्रेय कोणाला मिळते, यापेक्षा ही कामे दर्जेदार पद्धतीने आणि लवकरात लवकर पूर्ण होणे महत्त्वाचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विकासकामांमध्ये राजकारण आणण्याऐवजी लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

या दोन्ही रस्त्यांमुळे परिसरातील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः कामावर जाणारे कामगार, शाळा-महाविद्यालयांत जाणारे विद्यार्थी आणि दररोज या मार्गांचा वापर करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळू शकतो. त्यामुळे रस्त्यांची उर्वरित कामे लवकर पूर्ण करून वाहतुकीसाठी मार्ग सुकर करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> “प्रशासकीय कार्यकाळात या रस्त्याचे काम चालू झाले आहे. सदर रस्त्याचे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम तातडीने पूर्ण करून लवकरच हा रस्ता वाहतुकीसाठी खुला केला जाईल.”
> -शिवाजी चौरे, **अभियंता स्थापत्य विभाग, फ प्रभाग**

> “चिखली चौक ते सोनवणेवस्तीकडे जाणाऱ्या २४ मीटर रस्त्यासाठी तसेच इंद्रप्रस्थ कार्यालयाचे संतपिटकडे जाणाऱ्या १८ मीटर रस्त्यासाठी आम्ही आमदार महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा केला. निविदा प्रक्रियेपासून ते मंजुरी मिळेपर्यंत सर्व प्रशासकीय बाबींची पूर्तता करून आम्ही हे काम प्रत्यक्षात आणले. आज हे काम पूर्ण होत असताना काही जण फुकटचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहेत.”
> -सोनम मोरे, **नगरसेविका**

एकीकडे रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात पोहोचल्याने चिखलीकरांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे, तर दुसरीकडे या कामांच्या श्रेयावरून राजकीय चर्चा रंगत आहे. आता लोकप्रतिनिधी श्रेयवाद बाजूला ठेवून कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी किती प्रयत्न करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# हॉर्न वाजवल्याचा राग; कॉलेजसमोर विद्यार्थ्याला चौघांकडून बेदम मारहाण!

» पिंपरी | प्रतिनिधी

**वाहनाचा हॉर्न वाजवून पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याचा राग आल्याने चार अनोळखी मुलांनी एका विद्यार्थ्याला गाडीतून बाहेर ओढून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यावेळी एका मुलाने विद्यार्थ्याच्या डोक्यात जड वस्तू मारल्याने तो गंभीर जखमी झाला. ही घटना १७ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास तळेगाव दाभाडे येथील नूतन इंजिनिअरिंग कॉलेजसमोरील रस्त्यावर घडली. या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात चार अनोळखी मुलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



श्रेयस बजरंग पवार (वय २२, विद्यार्थी) यांनी याप्रकरणी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रेयस पवार हे नूतन इंजिनिअरिंग कॉलेजचे विद्यार्थी आहेत. १७ ऑक्टोबर रोजी रात्री ते कॉलेजमधून चारचाकी वाहनाने घरी जात होते. यावेळी कॉलेजसमोरील रस्त्यावर काही मुले घोळका करून उभी होती. त्यामुळे पवार यांनी हॉर्न वाजवून वाहन पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

हॉर्न वाजवल्याचा राग आल्याने सुरुवातीला दोन मुले पवार यांच्या वाहनाजवळ आली. ‘आम्ही गाववाले आहोत, तू आम्हाला हॉर्न देतो का?’ असे म्हणत त्यांनी पवार यांना गाडीतून बाहेर ओढले. त्यानंतर आणखी दोन मुले तेथे आली. चौघांनी मिळून पवार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

या मारहाणीदरम्यान एका मुलाने पवार यांच्या डोक्यात जड वस्तू मारली. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले.

# 42 वाहनांवर कारवाई; 48 हजार 500 रुपयांचा दंड!

## विशेष तपासणी मोहीम; वाहनांची कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे आवाहन




**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड परिसरात परराज्यात नोंदणी असलेल्या खासगी वाहनांविरुद्ध प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान मोटार वाहन कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. १ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण ४८ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.**

महाराष्ट्राबाहेरील राज्यांमध्ये नोंदणी असलेली अनेक खासगी वाहने पिंपरी-चिंचवड परिसरात दैनंदिन वापरात आहेत. नोकरी, व्यवसाय तसेच इतर कामांच्या निमित्ताने शहरात वास्तव्यास असलेले नागरिक परराज्यातील नोंदणी क्रमांक असलेल्या वाहनांचा वापर करतात. मात्र, महाराष्ट्रात वाहन चालवताना मोटार वाहन कायद्यातील नियमांचे पालन करणे आणि वाहनाशी संबंधित आवश्यक कागदपत्रे वैध व अद्ययावत ठेवणे बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत परराज्यात नोंदणी असलेल्या खासगी वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान वाहनांची आवश्यक कागदपत्रे आणि मोटार वाहन कायद्यातील तरतुदींच्या पालनासंदर्भात तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. १ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत एकूण ४२ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, संबंधित वाहनधारकांकडून एकूण ४८ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. परराज्यातील वाहनांचा वापर करताना नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी अशा तपासणी मोहिमांना महत्त्व आहे.

वाहनधारकांनी आपल्या वाहनाची कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याबरोबरच वैध विमा प्रमाणपत्र आणि वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे. वाहन चालवताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसल्यास संबंधित वाहनधारकांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे वाहनांची कागदपत्रे तपासून घेणे आणि त्यांची वैधता कायम ठेवणे गरजेचे आहे.

तसेच, परराज्यात नोंदणी असलेल्या वाहनाचा नोंदणी क्रमांक बदलण्याची प्रक्रिया लागू होत असल्यास मोटार वाहन कायद्यातील कलम ४८ नुसार ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) सादर करण्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहनधारकांना सूचना दिल्या आहेत. महाराष्ट्रात वाहनाचा वापर करताना लागू असलेल्या नियमांनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करणे ही वाहनधारकांची जबाबदारी आहे.

परराज्यात नोंदणी असलेल्या खासगी वाहनधारकांनी वाहनाची कागदपत्रे वेळोवेळी तपासावीत, विमा आणि प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र वैध ठेवावे, तसेच आवश्यकतेनुसार नोंदणीसंदर्भातील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी. नियमांचे उल्लंघन टाळण्यासाठी वाहनधारकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# कर्नाटकातून आलेला १० टन संशयास्पद खवा-पनीर जप्त!



**पिंपरी | प्रतिनिधी**

**दसरा आणि दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर मिठाई तसेच दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढत असतानाच पुणे अन्न व औषध प्रशासनाने (FDA) मोठी कारवाई केली आहे. कर्नाटकातून पुण्यात आणण्यात येणारा संशयास्पद खवा आणि पनीरचा साठा जप्त करण्यात आला आहे. कसबा पेठ, बिबवेवाडी आणि बावधन परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत तीन ते चार वाहने ताब्यात घेण्यात आली असून, अंदाजे ३५ लाख रुपये किमतीचा सुमारे १० टन खवा आणि पनीर जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. या कारवाईमुळे सणासुदीच्या काळात बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**

दसरा आणि दिवाळीच्या काळात मिठाई, पेढे, बर्फी तसेच इतर दुग्धजन्य पदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी विविध ठिकाणांहून खवा आणि पनीरचा पुरवठा केला जातो. मात्र, या पदार्थांची गुणवत्ता आणि अन्नसुरक्षेच्या निकषांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करणे आवश्यक असते. याच पार्श्वभूमीवर पुणे अन्न व औषध प्रशासनाने संशयास्पद खवा आणि पनीरच्या साठ्यावर कारवाई केली.

जप्त करण्यात आलेल्या खवा आणि पनीरच्या साठ्यावर उत्पादनाची तारीख, संबंधित तपशील तसेच अन्नसुरक्षेच्या निकषांबाबत आवश्यक माहिती छापलेली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या पदार्थांच्या गुणवत्तेबाबत आणि सुरक्षिततेबाबत संशय व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित पदार्थ कोणत्या परिस्थितीत तयार करण्यात आले, त्यांची साठवणूक कशी करण्यात आली आणि ते मानवी सेवनासाठी सुरक्षित आहेत का, याबाबत तपासणी होणे आवश्यक आहे.

सणासुदीच्या काळात अशा पदार्थांचा वापर मिठाई तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे संशयास्पद साठा बाजारात पोहोचण्यापूर्वीच त्याची तपासणी करणे महत्त्वाचे ठरते. अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईमुळे हा साठा पुढील तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेल्या खवा आणि पनीरचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात येणार आहेत. या नमुन्यांच्या तपासणीतून पदार्थांची गुणवत्ता, त्यांची सुरक्षितता आणि संभाव्य भेसळीबाबत स्पष्टता येणार आहे. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच या पदार्थांमध्ये भेसळ आहे किंवा ते मानवी आरोग्यासाठी घातक आहेत का, याबाबत ठोस निष्कर्ष काढता येणार आहे.

सध्या या साठ्याबाबत संशय व्यक्त करण्यात येत असला, तरी प्रयोगशाळेच्या अहवालाशिवाय पदार्थांमध्ये भेसळ असल्याचे निश्चितपणे सांगता येणार नाही. त्यामुळे पुढील तपासणी आणि अहवालाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

दसरा आणि दिवाळीच्या काळात मिठाई तसेच दुग्धजन्य पदार्थांची खरेदी मोठ्या प्रमाणात केली जाते. अशा वेळी पदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षितता याकडे ग्राहकांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. संशयास्पद किंवा दर्जाबाबत खात्री नसलेल्या पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते. नागरिकांनी मिठाई, खवा आणि पनीर खरेदी करताना विश्वासार्ह विक्रेत्यांची निवड करावी. पॅकबंद पदार्थांवरील उत्पादनाची तारीख, वापरण्याची अंतिम तारीख आणि इतर आवश्यक माहिती तपासावी. तसेच पदार्थांचा रंग, वास किंवा साठवणुकीची स्थिती संशयास्पद वाटल्यास ते खरेदी करणे टाळावे.

# समान पाणीपुरवठा योजनेला विलंबाचे ग्रहण!

## कोटी खर्चूनही ८७.७८ टक्केच काम पूर्ण; पुणेकरांच्या पाणीटंचाईच्या तक्रारी!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणेकरांना समान दाबाने आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी पुणे महापालिकेने हाती घेतलेल्या समान पाणीपुरवठा योजनेला विलंबाचे ग्रहण लागले आहे. वारंवार मुदतवाढ देऊनही योजनेचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. उपलब्ध माहितीनुसार, या योजनेचे ८७.७८ टक्के काम पूर्ण झाले असून, सुमारे अडीच हजार कोटी रुपये खर्च होऊनही शहरातील पाणीगळती आणि असमान पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायम असल्याचे चित्र आहे. त्यामुळे योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर तरी पुणेकरांना समान आणि नियमित पाणी मिळणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**




### अडीच हजार कोटींच्या खर्चानंतरही प्रश्न कायम

समान पाणीपुरवठा योजनेवर महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला आहे. एवढा खर्च करूनही योजनेचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही आणि काही भागांत पाणीपुरवठ्याच्या तक्रारी कायम आहेत. त्यामुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी उर्वरित कामांना गती देणे, मीटर प्रणाली कार्यान्वित करणे आणि प्रत्यक्ष पाणी वितरणातील त्रुटी दूर करणे आवश्यक ठरणार आहे.

शहराच्या पाणी वितरण व्यवस्थेतील सुमारे ४० टक्के गळती रोखणे आणि प्रत्येक भागातील नागरिकांना समान प्रमाणात पाणी उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. पुढील ३० वर्षांतील शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन ही योजना आखण्यात आली आहे. भविष्यातील ४९ लाख २१ हजार ६६३ लोकसंख्या गृहीत धरून पाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या योजनेला पुणे महापालिकेच्या मुख्य सभेने मे २०१५ मध्ये मंजुरी दिली होती. त्यानंतर २०१८ मध्ये निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली. हे काम ३६ महिन्यांत, म्हणजेच २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, निर्धारित मुदतीत काम पूर्ण न झाल्याने त्याला वारंवार मुदतवाढ द्यावी लागली. तीन वर्षांचा अतिरिक्त कालावधी उलटूनही योजना पूर्णत्वास न गेल्याने नियोजन आणि अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत संपूर्ण शहराचे १४१ झोनमध्ये विभाजन करण्यात आले आहे. या व्यवस्थेमुळे प्रत्येक भागात पाण्याचे वितरण नियंत्रित करणे, गळती शोधणे आणि नागरिकांना समान दाबाने पाणीपुरवठा करणे अपेक्षित आहे. योजनेत ७९ पाणी साठवण टाक्या, १,२६८.९७ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या आणि पाणी साठवण टाक्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या १०१.५४ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या उभारण्याचे नियोजन आहे.

याशिवाय, दोन लाख ३२ हजार ६५२ पाणी मीटर बसविणे, सात नागरी सुविधा केंद्रे उभारणे आणि सहा नवीन पंपिंग स्टेशन तयार करणे, अशा विविध कामांचा या प्रकल्पात समावेश आहे. या पायाभूत सुविधांच्या माध्यमातून पाण्याचे वितरण अधिक कार्यक्षम करण्याचा महापालिकेचा उद्देश आहे. मात्र, प्रत्यक्षात कामाची गती अपेक्षेप्रमाणे नसल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४१ झोनपैकी केवळ ५० झोनचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे उर्वरित झोनमधील कामे कधी पूर्ण होणार आणि संपूर्ण शहराला या योजनेचा लाभ कधी मिळणार, याबाबत अनिश्चितता कायम आहे.

बाणेर-बालेवाडी, पाषाण, सुस, वारजे, महंमदवाडी, कोंढवा-महंमदवाडी आणि सिंहगड रस्ता परिसरातील काही झोनमध्ये काम पूर्ण झाले आहे. तरीही या भागातील नागरिकांच्या पाणीपुरवठ्याबाबतच्या तक्रारी कमी झालेल्या नाहीत. काही ठिकाणी पाणी मिळण्याची वेळ, तर काही ठिकाणी पाण्याचा अपुरा दाब यांसारख्या समस्या कायम असल्याचे चित्र आहे.

# पुण्यातील चहाच्या टपरीवर शिजला नीट पेपरफुटीचा कट!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**वैद्यकीय प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पात्रता-सह-प्रवेश परीक्षेच्या (नीट) पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. पुण्यात कोचिंग सेंटरबाहेर चहाची टपरी चालवणाऱ्या व्यक्तीने नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १० विद्यार्थ्यांना नाशिकमधील एका घरात ठेवून त्यांना परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) चहाच्या टपरीचा मालक शेषराव बजरंग सूर्यवंशी याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणातील तो १४ वा आरोपी असल्याचे समोर आले आहे.**




पुण्यातील एका कोचिंग सेंटरबाहेर सूर्यवंशी याचा 'मालक चहा' नावाचा स्टॉल आहे. एप्रिल महिन्यात नीट परीक्षेची तयारी करणारे दोन विद्यार्थी या टपरीवर बसले होते. परीक्षेची तयारी आणि प्रश्नपत्रिकेबाबत चिंता व्यक्त करत असताना सूर्यवंशी याने त्यांच्याशी संवाद साधला. आपल्या ओळखीचा एक डॉक्टर मित्र थेट नीटची प्रश्नपत्रिका मिळवून देऊ शकतो, असा दावा त्याने केल्याचे तपासात समोर आले आहे. यासाठी त्याने विद्यार्थ्यांकडे प्रत्येकी ४.५ लाख रुपयांची मागणी केल्याचे सांगण्यात येते.

विद्यार्थ्यांशी व्यवहार निश्चित झाल्यानंतर सूर्यवंशी याने त्यांना नाशिक जिल्ह्यातील पंचक गावात नेण्याची व्यवस्था केली.

### प्रश्नपत्रिकेचा फोटो मोबाईलमध्ये स्कॅन!

ठेकेदाराने रस्त्याचे काम पूर्ण केल्यानंतर रस्त्याच्या दोषदायित्व कालावधीमध्ये (डीएलपी) दुरुस्तीची गरज भासल्यास काही ठेकेदारांकडून दुरुस्तीचे काम नाकारले जाते. त्यामुळे 'डीएलपी'च्या निश्चित कार्यपद्धतीमध्ये (एसओपी) बदल करणे आवश्यक आहे. रस्त्याची कोणती हानी झाल्यानंतर ठेकेदाराने दुरुस्ती करणे बंधनकारक राहील, याचे स्पष्ट निकष निश्चित करणे आवश्यक असल्याचे महापौर नागपुरे यांनी सांगितले.

२८ एप्रिल रोजी हे दोन्ही विद्यार्थी तेथील एका घरात पोहोचले. त्या ठिकाणी आधीपासूनच आणखी आठ विद्यार्थी उपस्थित होते. अशा प्रकारे एकूण १० विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी ठेवण्यात आले होते.

विद्यार्थ्यांकडून पैसे मिळण्याची खात्री करण्यासाठी सूर्यवंशी याने त्यांच्या दहावी आणि बारावीच्या प्रमाणपत्रांसह इतर महत्त्वाची कागदपत्रे स्वतःकडे जमा करून घेतल्याचा आरोप आहे. या कागदपत्रांच्या आधारे विद्यार्थ्यांवर आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी दबाव ठेवण्यात आल्याचे तपासात उघड झाल्याचे सांगण्यात येते.

नीट परीक्षेच्या तीन ते चार दिवस आधी या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका अभ्यासासाठी देण्यात आल्याचा आरोप आहे. परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न आधीच पाहण्याची संधी मिळाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. २ मे रोजी परीक्षा केंद्रावर जाण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका परत करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, यातील एका विद्यार्थ्याने मोबाईलमध्ये प्रश्न स्कॅन करून त्यांची प्रत जतन केल्याचे समोर आले. या डिजिटल पुराव्यामुळे प्रकरणाच्या तपासाला महत्त्वाचा धागा मिळाल्याचे मानले जात आहे.

# दिवाळीसाठी पुणे विभागातून 1200 एसटी गाड्या!

## दिवाळीच्या गर्दीसाठी नियोजन; मराठवाडा, विदर्भासह प्रमुख मार्गांवर जादा गाड्या

**» पुणे | प्रतिनिधी**

**दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पुणे विभागाने सुमारे १२०० नियमित व अतिरिक्त बसगाड्यांचे नियोजन केले आहे. मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख शहरांसाठी या गाड्या सोडण्यात येणार आहेत. दरम्यान, धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रवाशांची सोय करण्यासाठी पुणे-नागपूर-पुणे अनारक्षित विशेष रेल्वेच्या फेऱ्यांचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.**



दिवाळीच्या काळात पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून मोठ्या संख्येने नागरिक आपल्या मूळ गावी जातात. त्यामुळे बसस्थानकांवर होणारी गर्दी लक्षात घेऊन एसटी प्रशासनाने जादा गाड्यांचे नियोजन केले आहे. स्वारगेट, शिवाजीनगर, पुणे स्टेशन आणि पिंपरी-चिंचवडसह विभागातील विविध आगारांमधून या गाड्या सोडण्यात येणार आहेत. नियमित फेऱ्यांव्यतिरिक्त प्रवाशांची गर्दी वाढल्यास मागणीनुसार अतिरिक्त गाड्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

प्रवाशांनी ऐनवेळी होणारी गर्दी टाळण्यासाठी एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा आरक्षण केंद्रांमधून आगाऊ तिकीट आरक्षित करावे, असे आवाहन एसटी प्रशासनाने केले आहे.

गाडी क्रमांक ०१२१५ पुणे-नागपूर विशेष रेल्वे १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २.५० वाजता पुणे रेल्वे स्थानकावरून सुटणार असून, २० ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० वाजता नागपूरला पोहोचेल. या गाडीची एक फेरी चालविण्यात येणार आहे.

परतीच्या प्रवासासाठी गाडी क्रमांक ०१२१६ नागपूर-पुणे विशेष रेल्वे २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता नागपूरहून सुटेल. ही गाडी २२ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.१० वाजता पुणे रेल्वे स्थानकावर पोहोचेल. या गाडीचीही एकच फेरी असणार आहे.

या विशेष रेल्वेला एकूण १८ आयसीएफ डबे जोडण्यात येणार आहेत. त्यापैकी सामान्य द्वितीय श्रेणी आणि शयनयान श्रेणीचे १६ डबे अनारक्षित असतील, तर दोन गार्ड व लगेज व्हॅन असतील. त्यामुळे प्रवाशांना अनारक्षित तिकिटावर प्रवास करता येणार आहे.

पुणे आणि नागपूरदरम्यान दोन्ही दिशांनी धावणारी ही गाडी दौंड कॉर्डलाइन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, अनकाई, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, नांदुरा, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा आणि अजनी या स्थानकांवर थांबणार आहे.

विशेष रेल्वेचे सर्व डबे अनारक्षित असल्याने प्रवाशांना यूटीएस प्रणालीद्वारे किंवा रेल्वे स्थानकांवरील तिकीट खिडक्यांमधून तिकीट काढता येईल. या विशेष गाड्यांसाठी मेल-एक्स्प्रेस गाड्यांचे नियमित भाडे आकारण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

### १८ डब्यांची विशेष रेल्वे!

पुणे-नागपूर विशेष रेल्वेला एकूण १८ डबे असणार आहेत. यामध्ये १६ अनारक्षित प्रवासी डबे आणि दोन गार्ड व लगेज व्हॅनचा समावेश आहे. या गाडीला दौंड कॉर्डलाइन, अहिल्यानगर, मनमाड, भुसावळ, अकोला आणि वर्धा यांसह विविध स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत. प्रवाशांना यूटीएस प्रणाली किंवा रेल्वे स्थानकावरील तिकीट खिडकीतून अनारक्षित तिकीट काढता येणार आहे.

# अपघाताच्या भरपाईच्या नावाखाली तरुणीकडून ५० हजार उकळले!

**» पुणे | प्रतिनिधी**

**कारचा टायर फुटल्याने झालेल्या अपघातानंतर भरपाईच्या नावाखाली २१ वर्षीय तरुणीकडून ऑनलाइन ५० हजार रुपये घेतल्याचा प्रकार पुण्यात समोर आला आहे. अपघातानंतर पैशांची मागणी करून तरुणीवर दबाव टाकण्यात आला. तसेच, पैसे न दिल्यास तिच्या करिअरचे नुकसान करण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्वारगेट मेट्रो स्टेशन परिसरात हा प्रकार घडला. याप्रकरणी मयूर राजेंद्र रंगदळे (रा. नांदेड सिटी, सिंहगड रस्ता) याच्याविरुद्ध स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित २१ वर्षीय तरुणी १५ ऑक्टोबर रोजी रात्री सव्वाअकराच्या सुमारास आपल्या अमेझ कारमधून घरी जात होती. त्यावेळी ती निलायम पुलाच्या दिशेने प्रवास करीत होती. पुलाच्या आधी स्वामी समर्थ मंदिरासमोर पोहोचली असता तिच्या कारचा पुढील उजव्या बाजूचा टायर अचानक फुटला. त्यामुळे कारवरील नियंत्रण सुटले आणि वाहनाचा अपघात झाला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे रस्त्यावरील वाहतुकीदरम्यान दोन वाहनांमध्ये घर्षण होण्याची घटना घडली.

याचवेळी मागून येणाऱ्या लाल रंगाच्या मारुती सुझुकी व्हिक्टोरिस कारने तरुणीच्या अमेझ कारला पाठीमागून घासले. या घटनेत दोन्ही वाहनांचे एकमेकांशी घर्षण झाले. संबंधित कारचालकाने वाहन चालवताना दोन गाड्यांमध्ये सुरक्षित अंतर ठेवले नसल्याचा आरोप तरुणीने दिलेल्या तक्रारीत केला आहे. टायर फुटल्यामुळे झालेली ही घटना आणि त्यानंतर निर्माण झालेला वाद यामुळे पुढील घडामोडींना सुरुवात झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

अपघातानंतर दुसऱ्या दिवशी, म्हणजेच १६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास स्वारगेट मेट्रो स्टेशनजवळ तरुणीला धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. अपघाताच्या घटनेचा संदर्भ देत भरपाईच्या नावाखाली तिच्याकडे पैशांची मागणी करण्यात आली. पैसे देण्याबाबत तिच्यावर दबाव आणण्यात आला. तसेच, पैसे न दिल्यास तिच्या करिअरचे नुकसान करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अपघातानंतरचा वाद केवळ वाहनांच्या नुकसानीपुरता मर्यादित न राहता पैशांच्या मागणीपर्यंत पोहोचल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, अपघाताच्या भरपाईचा मुद्दा उपस्थित करून तरुणीकडून पैसे घेण्यासाठी दबाव टाकण्यात आला.

तिच्या करिअरवर परिणाम करण्याची धमकी दिल्याने तिला मानसिक दबावाला सामोरे जावे लागल्याचा आरोप आहे. या दबावातून तरुणीकडून ऑनलाइन पद्धतीने ५० हजार रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. अपघाताच्या भरपाईच्या नावाखाली एवढी मोठी रक्कम घेतल्याचा आरोप असल्याने या प्रकरणात पैशांच्या मागणीची पद्धत आणि धमकी दिल्याच्या घटनेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

या घटनेप्रकरणी संबंधित तरुणीने स्वारगेट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर १७ ऑक्टोबर रोजी मयूर राजेंद्र रंगदळे (रा. नांदेड सिटी, सिंहगड रस्ता) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### अपघाताच्या भरपाईच्या नावाखाली ५० हजार

अपघातानंतर भरपाईच्या नावाखाली २१ वर्षीय तरुणीकडून ऑनलाइन ५० हजार रुपये घेतल्याचा आरोप आहे. पैसे देण्यासाठी दबाव टाकत करिअर उद्ध्वस्त करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी मयूर राजेंद्र रंगदळे याच्याविरुद्ध १७ ऑक्टोबर रोजी स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.